• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८२ • गुरुवार,दि. ११ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 282 • Thursday 11 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

शिवसेना फक्त ठाकरेंचीच सर्वोच्च न्यायालयात जाणार

मुंबई । वृत्तसंस्था

विधासभा अध्यक्षांनी आरोपींची दोन वेळा भेट घेतली. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश हे परिमाण मानले जातात. पण नार्वेकरांनी जो निकाल दिला आहे. यातून त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचाच अवमान केला आहे. अर्थात निकालाची मॅच फिक्सिंग होती, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्षांवर केला. तर आमची लढाई सुरूच राहील, आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत, पण जनता देखील यातून सर्वांना धडा शिकवेल, असा विश्वास ठाकरेंनी व्यक्त केला.

जर आमची घटना ग्राह्य धरत नसाल तर आम्हाला अपात्र का केले नाही. निर्णय देताना पायाच चुकला आहे. तो डळमळीत आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केला आहे. त्यामुळे त्याचा गैरफायदा घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे अस्तित्व टीकणार आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. माझी सर्वोच्च न्यायालयास विनंती आहे. निवडणुकीच्या आधी दूध की दूध आणि पाणी का पाणी होऊन जाऊ द्या, अशी विनंती उद्धव ठाकरे यांनी सुप्रीम कोर्टाकडे केली. अवमान याचिका टाकता येते का, याचा विचार करू असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले की, शिंदेंची शिवसेना होऊच शकत नाही, हे सर्व काही सेटिंग होती. ३१ डिसेंबरची तारीख, १० तारीख अशी चालढकल करायची होती. तर पक्षांतर बंदीच्या कायद्याला त्यांना संपवायचे आहे. त्यामुळे आगामी काळातील मार्ग सोपा करण्याचे काम नार्वेकर करत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. नार्वेकरांची वागणूक ही मिलीभगत दर्शवणारी होती. कटकारस्थान चाललंय का? यावर मला शंका होती. आजच्या निकालामुळे एक बाब समोर आली, असे उद्धव ठाकरे म्हणाले. आजचा निकाल म्हणजेच लोकशाहीचा गळा घोटला, पक्षांतर बंदीचा कायदा मजबूत करण्याऐवजी कमकुवत केला. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय सर्वोच्च असतात. मात्र नार्वेकरांचा निर्णय धाब्यावर बसवून निर्णय घेण्यात आला. यातून आम्हीच सर्वोच्च असल्याचे नार्वेकरांनी दाखवून दिलं. निर्लज्जपणाचा कळस यांनी गाठलेला आहे. अवमान याचिका दाखल करता येत असेल तर त्यांनी ती करावी, अशी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली. गद्दार कुणाच्या जीवावर निवडून आले. नेता समाजाला दिशा दाखवण्याचं काम करत असतो. परंतु नेताचं जर चुकीच्या मार्गाने जात असेल तर काय दिशा दाखवणार. जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करून शिवसेना संपवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शिंदे आणि शिवसेना हे नातं तुटलेलं आहे. आजचा निर्णय हा सर्वोच्च नाही. उबाठा नव्हे तर या अन्यायाविरोधात उभा ठाकरे आहे. असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी पुढील लढाई लढण्याचा निर्धार केला.

ठाकरेंना सुप्रीम कोर्टात न्याय मिळेल; हा न्यायालयीन नव्हे राजकीय निकाल

मुंबई । वृत्तसंस्था

हा निर्णय उद्धव ठाकरे यांना अनुकूल झालेला दिसत नाही. तर सत्ताधारी पक्षातील लोकांना निकाल काय लागणार हे माहित होते. तसे विधान त्यांनी केले. तसाच निकाल लागला आहे. त्यावरून सुप्रीम कोर्टात उद्धव ठाकरेंना जावे लागेल, या जजमेंटवरून सुप्रीम कोर्टात उद्धव ठाकरेंना न्याय मिळेल, असे शरद पवार म्हणले. जो काही निकाल मी पाहिला, डॉक्युमेंट्स पाहिल्यानंतर आणि वकिलांशी चर्चा केल्यानंतर अधिक स्पष्टता येईल. पण उद्धव ठाकरेंना न्यायालयात जावं लागेल. एक गोष्ट मात्र खरी आहे की, विधिमंडळ पक्ष आणि पक्ष या ठिकाणी जो निकाल घेतला आहे, यात विधिमंडळ पक्ष याला महत्त्व दिलेलं आहे. सुभाष देसाई व्हर्सेस गव्हर्नमेंट या जजमेंटमध्ये सुप्रीम कोर्टाच्या ५ जजेसच्या जजमेंटमध्ये हा निकाल दिला आहे की, पक्ष संघटना महत्त्वाची आहे. सत्ताधाऱ्यांना निकालाबाबत आधीच माहिती होतं. सुभाष देसाईंच्या केसमध्ये पक्ष संघटना महत्त्वाची असा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. न्यायापीठाने अनेकदा ही गोष्ट सांगितली की, व्हीप किंवा कुठलाही आदेश हा देण्याचा अधिकार पक्ष संघटनेला आहे, विधिमंडळ पक्षाला नाही. त्यामुळे या ठिकाणी व्हीपची निवड ही उद्धव ठाकरेंच्या संघटनेच्या वतीने केलेली नाही, जजमेंटमध्ये म्हटलंय. १०वं शेड्युल हे प्रकारची दिशा देणारे शेड्युल आहे. शरद पवार म्हणले की, याच्यामध्ये पक्षसंघटना महत्त्वाचे आहे. असा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. तर आज अध्यक्षांनी विधिमंडळामध्ये बहुमत कोणाचे आहे. व्हिप कुणाचा आहे. विधिमंडळाच्या पक्षाला महत्त्व दिले आहे. इथे गंमत झाली आहे. व्हीप मोडला तर अपात्र धरले जाते. मात्र इथे काय झाले. व्हीप न पाळल्याने अपात्र ठरवण्याची मागणी न मान्य करत दोन्ही बाजूच्या लोकांना पात्र ठरवले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबतच्या लोकांना अपात्र करण्याची मागणी शिंदे यांनी केली. त्याला देखील अध्यक्षांनी नाकारले आहे. याचा स्पष्ट अर्थ आहे की सुप्रीम कोर्टाचा निर्णय पूर्णपणे बदलण्याचे काम या निर्णयात करण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाने निरीक्षण नोंदवलं की, उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला नसता तर आम्हाला निकाल फिरवता आला असता. सुप्रीम कोर्टाचं हे भाष्य अतिशय महत्त्वाचं आहे. यामुळे माझी खात्री आहे की, उद्धव ठाकरेंना न्याय मिळेल. आता दोन-तीन महिन्यांनी लोकसभा आणि पाच-सहा महिन्यांनी विधानसभा निवडणुका आहेत. ज्या पद्धतीने आम्ही इंडिया आघाडीत जो एकत्रित विचार करतोय, त्यात आम्ही सर्व जनतेसमोर जाऊ.

शिवसेना ठाकरे गटाचा आज संपर्क दौरा - जिल्हाप्रमुख सातपुते

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, माजी मंत्री तथा सहसंपर्क प्रमुख बदामराव आबा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या दि. ११/०१/२०२४ रोजी शिवसेना आष्टी, पाटोदा,शिरूर पदाधिकाऱ्यांचा संपर्क दौरा होत आहे तरी आष्टी, पाटोदा,शिरूर, या भागातील शिवसेना युवासेना, महिला आघाडी, किसान सेना,आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे. बैठकीचे ठिकाण: पाटोदा विश्रामगृह:११:३० मी., आष्टी विश्रामगृह: २:००, शिरूर बसस्थानका शेजारी: ४:००

आम्ही २० जानेवारीला मुंबईत मोर्चा काढू -जरांगे

मराठा आरक्षण

संभाजीनगर । प्रतिनिधी

आमदार पात्र होतील अथवा अपात्र त्याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. मराठा आरक्षणासाठी २० जानेवारी रोजी मुंबईला मोर्चा काढू, असे मनोज जरांगे म्हणाले. आमच्या नोंदी सापडलेल्या असतानाही कायदा पारित होत नाही. बैठका होत राहतात मात्र त्यातून काही होत नाही. २० जानेवारी रोजी मुंबईला निघण्याची तयारी झालेली आहे . तयारी अंतिम टप्प्यात आहे. आरक्षण घेतल्याशिवाय आता माघार नाही. किती लोक येणार आहे याचा शोध घेण्यासाठी सरकारी यंत्रणाही कामाला लागली आहे, असे जरांगे म्हणाले. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी आंदोलन उभे कारानरे मनोज जरांगे पाटील यांना व्हायरल फिव्हरमुळे मंगळवारी सायंकाळी छत्रपती संभाजीनगरातील एक खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तापामुळे त्यांना अशक्तपणा आला आहे, अशी माहिती त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली. सरकार म्हणतंय २० तारखेच्या आत आरक्षण देऊ, मागच्या वेळेसही म्हटले होते. आता आम्ही मागच्या घटनेवरून सावध झालो आहोत. आम्ही शांततेत आंदोलन करणार असून, पुण्यापासून पुढे आंदोलकांची जास्त संख्या असणार आहे. मुंबईजवळ जाताच हा आकडा २ ते ३ कोटीपर्यंत जाईल. समाज बांधवांची एवढी संख्या असली तरी कुणालाही त्रास होणार नाही. सरकारचा आकडा कमी असला तर तो चुकणार, कारण संख्या अफाट राहणार असल्याचे जरांगे - पाटील म्हणाले.

विधानसभा अध्यक्षांचा निकाल, लोकशाहीची हत्या -आदित्य ठाकरे

मुंबई । वृत्तसंस्था

विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेला निकाल म्हणजे लोकशाहीची हत्या आहे. आम्ही या विरोधात कायदेशीर लढाई लढू, असा निर्धार पाणावलेल्या डोळ्यांनी आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. शिंदे गट हीच खरी शिवसेना असल्याचा निर्णय विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी दिला आहे. तर शिंदे गटाचे १६ आमदार पात्र असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे ही यांनी प्रतिक्रिया दिली. नार्वेकर यांच्याकडून काय अपेक्षा करायची? कारण सर्व काही सेटींग झाली आहे, अशी आदित्य ठाकरे यांनी दिली. मूळ राजकीय पक्ष संदर्भात विधानसभा अध्यक्ष यांनी दिलेला निर्णय निर्लज्जपणाचा कळस आहे. लोकशाहीच्या हत्या करणारा आहे. विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय देशासाठी मोठे संकेत आहेत. २०२४ मध्ये अशा प्रकारची गद्दारी झाली तर, खोक्यांचे राजकारण झाले तर असेच त्यांना वाचवलं जाणार. भाजपाला आपले संविधान बदलायचे आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहून दिलेले संविधान भाजपला मान्य नाही, भाजपला स्वतःच संविधान घ्यायचा आहे ते स्पष्ट झाले. अनेक वर्षे नार्वेकर आमच्या पक्षात होते, तेव्हा ते कुठल्या पक्षप्रमुखाच्या तिकिटावर लढत होते ? असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित करत राहुल नार्वेकरांवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे आजारी असताना यांनी गद्दारी केली, असे आदित्य ठाकरे म्हणाले. लोकशाहीची एवढी निर्लज्ज हत्या मी कधी पाहिली नाही. लोकशाहीमध्ये खोके सरकारची उलट तपासणी आता जनताच करेल. सुप्रीम कोर्टाकडून अपेक्षा आहे, पण जास्त अपेक्षा जनतेकडून आहे. आम्ही सर्व व्हिडिओ रेकॉर्डिंग निवडणूक आयोगाला दिलेत. जगाला आता कळलेला आहे की आपल्या देशात लोकशाहीला मारलेला आहे आणि देशात हिटलर शाही सुरू झालेले आहे.जगाला आता कळलेला आहे की आपल्या देशात लोकशाहीला मारलेला आहे आणि देशात हिटलर शाही सुरू झालेले आहे. या निर्णयाविरोधात कायदेशीर लढाई लढली जाईल, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं. ईडीच्या कारवाईपासून वाचवण्यासाठी, तुरुगांत जाण्यापासून वाचवण्यासाठी गद्दारांच्या टोळीच्या प्रमुखाने हे सगळं केलं. उद्धव ठाकरे आजारी असताना यांनी गद्दारी केली. उद्धव ठाकरे यांनी स्वतःची काळजी घेतली नाही या जनतेची काळजी घेतली. काय दिलं नव्हतं म्हणून उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसला. मंत्रीपद दिलं, ओळख दिली त्यांनाच फसवलं.किती काळं मन असेल या माणसाचं. ज्या माणसाला बेडवरून उठता येत नाही त्यावेळी गद्दारी केली.गोव्यात जाऊन कसे नाचले बघितला का? असं म्हणत आदित्य ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर हल्लाबोल केला. राज्यात जी सर्कस सुरु आहे ती थांबली पाहिजे. एक मंत्री बनायची क्षमता पण बनलेत मुख्यमंत्री. न्याय आम्ही शिवसेनेसाठी मागत नाही तर राज्यासाठी आणि देशासाठी मागतोय. महाराष्ट्र देखील देशातच आहे देशाच्या बाहेर नाही. आमच्या राज्यावर अन्याय का केला जातोय. असा सवाल उपस्थित करत आदित्य ठाकरेंनी एकनाथ शिंदे यांच्यावर घणाघात केला.

संपादकीय

निवडणुका अन् निवडणूक आयोगाची भुमिका

लोकसभा निवडणुकीचे वारे सर्वत्र वाहू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाची एकूणच भूमिका आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या संबंधातील विषय पुन्हा नव्याने ऐरणीवर आला आहे. दिल्लीसह देशाच्या अनेक भागात सध्या ईव्हीएमवर पुन्हा वारंवार आक्षेप नोंदवले जाऊ लागले आहेत. दिल्लीत जंतरमंतरवर वकिलांची एक संघटना ईव्हीएमच्या विरोधात आक्रमकपणे प्रकट झाली आहे. या सगळ्या अनुषंगाने 'इंडिया' आघाडीचे पक्ष विशेषत: काँग्रेसने इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रांच्या संबंधात काही आक्षेप जोरदारपणे उपस्थित केले आहेत. हे आक्षेप लेखी स्वरूपात निवडणूक आयोगाला कळवले गेले असून या संबंधात मुख्य निवडणूक आयुक्तांची भेटही त्यांनी मागितली आहे. तथापि निवडणूक आयुक्तांनी विरोधकांच्या शिष्टमंडळाला अपॉइन्टमेंट देण्यासच नकार दिला आहे. ही बाब कालच जयराम रमेश यांनी प्रसार माध्यमांच्या नजरेला आणली आहे. देशातील लोकसभेची निवडणूक प्रक्रिया हा एक महत्त्वाचा मामला आहे आणि ही प्रक्रिया निसंशय आणि पारदर्शीपणाने झाली पाहिजे ही सगळ्यांचीच अपेक्षा आहे. त्यामुळे यात निवडणूक आयोगाने महत्त्वाची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. पण जेव्हा विरोधकांच्या शिष्टमंडळाला भेटण्यासच मुख्य निवडणूक आयुक्त राजी नसतील तर इथपासूनच पाणी मुरण्यास सुरुवात होते. लोकसभेची निवडणूक प्रक्रिया ही सर्वच राजकीय पक्षांना विश्वासात घेऊन राबवणे अपेक्षित असताना विरोधकांना भेटणेच टाळणे हा पक्षपातीपणाच मानला जाईल, याचे गांभीर्य मुख्य निवडणूक आयुक्तांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. मतदान प्रक्रियेच्या संबंधात एखाद्या राजकीय पक्षाला काही शंका असेल तर त्याचे निराकरण निवडणूक आयोगाखेरीज अन्य कोण करू शकतो? जयराम रमेश यांनी सांगितल्यानुसार विरोधकांच्या आक्षेपांवर उत्तर म्हणून निवडणूक आयोगाने लेखी माहितीची एक पुस्तिका त्यांच्या तोंडावर फेकली आहे. ज्याला एफएक्यू म्हणजेच फ्रिक्वेंटली आस्कड क्वेश्चन असे म्हणतात त्याची एक लिखित पुस्तिका निवडणूक आयोगाने तयार केली असून विरोधकांच्या आक्षेपांना उत्तर म्हणून त्यांना प्रत्यक्ष न भेटता ही पुस्तिका त्यांच्या तोंडावर फेकणे हा हेकटपणा ठरतो ही बाब आयोगाला ध्यानात घ्यावी लागेल. ईव्हीएमच्या संबंधात जे जे आक्षेप उपस्थित करण्यात आले आहेत ते न्यायालयाने या आधीच निकाली काढले आहेत, असे निर्देशित करून निवडणूक आयोग विरोधकांना पुन्हा त्याच विषयावर एन्टरटेंट करण्याच्या मनस्थितीत नाही. तथापि विरोधकांच्या शिष्टमंडळाला भेटच देऊ नका असे न्यायालयानेही कधी म्हटलेले नाही त्यामुळे विरोधकांना भेटणे आयोगाने टाळण्याचे कारण नाही. विरोधकांच्या आक्षेपांना उत्तरे द्या किंवा नका देऊ पण निदान त्यांना भेटून त्यांचे म्हणणे तरी ऐकून घेणे हे निवडणूक आयोगाचे काम नाही काय, हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. अजून तर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियाही सुरू झालेली नसताना आयोगाच्या वर्तणुकीची ही गत असेल तर प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत त्यांचा एकूण रागरंग कसा असेल याची कल्पनाच केलेली बरी. भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात लोकसभेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी कोणत्याही शंकाकुशंकेला जागा मिळू नये याची परिपूर्ण दक्षता निवडणूक आयोगाने घेणे गरजेचे आहे. निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा ठपका येणे हे आयोगाच्या एकूणच घटनात्मक प्रतिमेला साजेसे असणार नाही. इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रांच्या बाबतीत लोकांच्या मनातील वाढत्या शंकेचे एकदा कायमचे निराकरण करणे ही आज काळाची गरज बनली आहे. रोज उठून हाच प्रश्न उभा राहात असेल तर त्याला कधीनाकधी सामोरे जावेच लागणार आहे. नुकत्याच पाच राज्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या; त्यातील मतदान प्रक्रियेचा जो तपशील चर्चिला गेला आहे त्यातून ईव्हीएम विषयीची शंका अधिक गडद झाली आहे. पोस्टल बॅलेटमधून लोकांनी दिलेला कौल आणि प्रत्यक्ष निवडणूक निकाल याचा ताळमेळ बसत नसल्याचाही आक्षेप त्यावेळी नोंदवला गेला आहे. पण तोही निवडणूक आयोगाला गंभीर वाटला नाही. निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने आयोगालाच स्वतःच्या कब्जात घेण्यास सर्वंकष प्रयत्न सध्याच्या सरकारकडून सुरू असल्याचा आरोप आहे. त्यासाठी सरकारने निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेतच हस्तक्षेप करून या निवड समितीतून सरन्यायाधीशांना वगळण्याचा प्रकार केला गेला आहे. सरकारच्या इतक्या जबरी प्रभावाखाली निवडणूक आयोगाकडून निष्पक्षपातीपणाची अपेक्षा ठेवायची की नाही हाही प्रश्न निर्माण होतो आहे. ईव्हीएमच्या संबंधातील संशय दूर करण्यासाठी मध्यंतरी उद्धव ठाकरे यांनी एक नामी कल्पना सुचवली होती. त्यांनी म्हटले आहे की मोदी सरकाराला स्वतःच्या लोकप्रियतेविषयी खूप आत्मविश्वास असेल तर त्यांनी किमान एक तरी निवडणूक मतपत्रिकांद्वारे घेऊन दाखवावी. त्यांच्या या भूमिकेला सत्ताधार्यांनी फार महत्त्व दिले नाही. विरोधक बोलतच असतात, त्यांच्या सगळ्याच आक्षेपांना उत्तर दिले पाहिजे असे नाही अशा भूमिकेत सरकार दिसले. पण त्याने मूळ विषय संपत नाही. केवळ ईव्हीएमच नव्हे तर विरोधकांच्या घटनात्मकदृष्ट्या रास्त आक्षेपांनाही निवडणूक आयोगाकडून विधायक प्रतिसाद मिळालेले नाही. याचे अगदी अलीकडेच उदाहरण राजस्थानातील विधानसभेच्या पोटनिवडणुकीचे आहे. तिथे भाजपने ज्या उमेदवाराला उमेदवारी जाहीर केली त्याला त्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री करण्यात आले. मतदारांवर गैरमार्गाने प्रभाव टाकण्याचा हा एक प्रकार होता. त्याविषयी अधिकृतपणे निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवली गेली; पण त्याही वेळी विरोधी काँग्रेसला न्याय मिळू शकला नव्हता अशी त्यांची तक्रार आहे. तथापि त्या पोटनिवडणुकीत मंत्री केलेल्या भाजपच्या उमेदवाराला मतदारांनी धडा शिकवून पराभूत केले हा भाग वेगळा, पण जी बाब नियमात बसत नाही त्याला अनुमती कशी दिली जाते हा आक्षेप दुर्लक्षित करता येऊ शकणार आहे काय? त्यामुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण पारदर्शकपणे व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने पूर्ण दक्षता बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्यावर एका घटनात्मक यंत्रणेची जबाबदारी आहे, आपण कोणाच्याही हातातले बाहुले नाही हे बाणेदारपणे दाखवून देण्याची संधी तिन्ही आयक्तांनी घेतली पाहिजे एवढेच यानिमित्ताने सुचवायचे आहे.

इयत्ता दहावी पासचे गुणपत्र हरवले आहे

निकिता सुंदरराव देशमुख या नावाचे इयत्ता दहावीचे गुणपत्रक दि.२२/१२/२०२३ रोजी बीड ते सोलापूर प्रवासा दरम्यान हरवले आहे. सापडल्यास संपर्क करा. मो.९४२२९९३७५८

तीन वर्षात सरकार अस्थिर! शेतकरी वाऱ्यावर

मुंबई । वृत्तसंस्था

एकनाथ शिंदे यांच्या या बंडामुळे नव्याने उदयास आलेले महाविकास आघाडी सरकार कोसळले होते. शिवसेनेच्या इतिहासात एकनाथ शिंदेच्या रूपाने झालेलं हे चौथं बंड होतं. पण या बंडाने राजकारणाचा पार चेहरामोहरा बदलून टाकला. सरकारची अस्थिरता जाणवायला लागल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवारही सत्तेत जाऊन विराजमान झाले. पण २०१९ च्या विधानसभा निवडणुका झाल्यानंतर राज्याला तीन कृषीमंत्री लाभले. पण शेतीप्रश्न तसेच आहेत, कोणत्याच शेतीमालाला दर नसल्याने शेतकरी संकटाच्या गर्तेत आहे. दुष्काळ, पाणीटंचाई हे मोठे प्रश्न समोर आ वासून उभे असताना सरकारच्या अस्थिरतेमुळे शेतकरी वाऱ्यावर सुटलाय असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी केला आहे. राज्याचा येणाऱ्या आर्थिक वर्षातील विकासदर हा मान्सूनच्या पावसावर ठरतो असं म्हणतात. कारण मान्सूनच्या पावसावर राज्यातील किंवा देशातील लागवडीखालील क्षेत्र, प्रत्यक्ष लागवड आणि पिकाचे उत्पादन अवलंबून असते. मान्सूनचा पाऊस चांगला झाला तर यंदा राज्याचं अर्थकारण चांगलं राहील अन् मान्सूनच्या पावसाने दांडी मारली तर अर्थकारण बिघडणार असं गणित असतं. कारण शेतीच्या उत्पादनावर पुढे अनेक उद्योगधंदे, प्रक्रिया उद्योग, रोजगार अवलंबून असतो. पण २०१९ च्या विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर राजकीय स्थित्यंतरे पाहायला मिळाली आणि त्यातच राज्याला तीन कृषीमंत्री मिळाले. महाविकास आघाडी सरकारमध्ये दादा भुसे, त्यानंतर शिंदे, फडणवीस सरकारमध्ये अब्दुल सत्तार आणि आता महायुती सरकारमध्ये राष्ट्रवादीचे धनंजय मुंडे. यंदा पावसाने दांडी मारल्यामुळे महाराष्ट्राच्या अनेक भागांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्याचबरोबर जुलै, नोव्हेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे शेतकरी होरपळून निघाला आहे. दुष्काळसदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांना पीकविम्याचा अग्रीम रक्कम देण्याची घोषणा केली पण दिवाळीपर्यंत ती मिळाली नाही. अनेक शेतकऱ्यांचे अर्जही बाद करण्यात आले. त्यातच कांदा, सोयाबीन आणि कापसाला हमीभावापेक्षा कमी दर मिळतोय, शेतकऱ्यांसाठी यापेक्षा मोठं दुर्दैव कोणतं असेल? द्राक्षा बागा मध्ये झालेल्या गारपिटीने अक्षरश: झोपल्या आहेत. दर नसल्याने संत्राही शेतकऱ्यांनी रस्त्यावर फेकून दिलाय. टोमॅटोला कुठं चांगला दर मिळायला लागला तर सरकारने नेपाळहून टोमॅटो आयात केला. कांद्याचीही तीच स्थिती. देशात उत्पन्न झाले असताना बाहेरून आयात करणे, आयातीवरील शुल्क कमी करणे असे निर्णय केंद्र सरकारकडून घेण्यात आले. सध्या लोकसभा निवडणुका तोंडावर आल्याने ग्राहकहिताचा विचार करून शेतमालाच्या दरावर अंकुश ठेवल्याचा आरोप विरोधकांकडून सरकारवर होतोय. पण यात होरपळतोय तो केवळ शेतकरी. ेतात पिकणाऱ्या मालाला हमीभाव मिळाला हीच माफक अपेक्षा शेतकऱ्यांची कित्येक वर्षापासून आहे. एकीकडे खतांचे दर वाढतात, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मालाचे दर वाढतात पण देशांतर्गत मालाला दर का मिळत नाही हा मोठा प्रश्न आहे. सरकार जर शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठांच्या दरावर अंकुश ठेवू शकत नसेल तर सरकारने उत्पादित झालेल्या शेतमालावर का अंकुश ठेवावा असा प्रश्न केला जातो. कित्येकदा आंदोलने होतात पण सरकारची धोरणे शेतकऱ्यांची गळचेपी करतात. तीन वर्षात राज्याला तीन वेगवेगळे कृषीमंत्री मिळाले. मागच्या चार वर्षात तीन मुख्यमंत्री मिळाले पण शेतीचे प्रश्न 'जैसे थे'च आहेत. राज्याचं सरकार अस्थिर आहे. अपात्रतेच्या निकालात काहीतरी निकाल लागेल पण येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील का हा प्रश्न आहेच. कांदा निर्यातबंदीमुळे तीस लाख कामगारांचा रोजगार गेला. शिवाय शेतकऱ्यांचं १४०० कोटीचं नुकसान झालं. पंचवीस वर्षापूर्वी जेवढे सोयाबीनचे दर होते तेवढा दर सध्या सोयाबीनला मिळत आहे. पण रासायनिक खतांच्या किंमतीत ४० टक्क्यांनी वाढ केली आहे. पण यावर राजकारणामध्ये काहीच चर्चा होताना दिसत नाही. शेतकरी वाऱ्यावर सुटलाय, सरकारचा हा सगळा सावळा गोंधळ सुरू आहे, जोपर्यंत शेतकरी यावर गांभीर्याने विचार करणार नाहीत तोपर्यंत ही परिस्थिती सुधारणार नाही.

तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुजोरी थांबवा

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून तलवाडा आरोग्य केंद्रा कडे पाहाण्यात येत असताना या आरोग्य केंद्रांचा पदबार डॉ. बनसोडे यांच्याकडे असल्यामुळे व त्यांच्याकडे इतरही आरोग्य केंद्राच्या असून या आरोग्य केंद्राची त्यांच्यामुळे वाहतात झालेली आहे तर त्यांचे आशीर्वादाने या ठिकाणी सुपरवायझर रुग्णांशी आरे राव्याची भाषा करत असल्यामुळे रुग्णांना या ठिकाणी वेळेवर उपचार मिळत नाही तर या ठिकाणी कॉटर असतानाही सदरील सुपरवायझर व डॉक्टर थांबत नसल्यामुळे आरोग्य केंद्र असून अडचण निर्माण झाल्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याने दि.१० रोजी आणि त्यांच्या विरोधात जिल्हाधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकार्याकडे तक्रार करण्यात आली असून तत्काळ चार्जर काढा व संबंधित अरेरावीची भाषा करणारावर कारवाई करा अशी मागणी तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते शेख खिजर सौदागर व त्यांच्या मित्र मंडळांनी केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. बनसोडे यांच्याकडे पद दिल्याने आरोग्य केंद्रांची वाताहात झालेली असून त्यांचे इन्चार्ज पद काढून दुसऱ्या व्यक्तीकडे देण्यात यावे तसेच या ठिकाणचे सुपरवायझर केदार आणि धुरवडे हे या ठिकाणी काम कमी राजकारण जास्त करत आहेत. (काम कमी व जातिवाद जास्त करतात.) तरी त्यांना समज द्यावी नसता बदली करावी तसेच शिपाई गालफडे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना अरे तुरीची भाषा वापरत आहे गेल्या अनेक वर्षापासून तो याच ठिकाणी नोकरीत असल्यामुळे व राजकारणी असल्यामुळे त्याची बदली झालेली नाही तरी त्याची या ठिकाणाहून तात्काळ बदली करण्यात यावी. डॉक्टर बनसोडे यांच्याकडील इन्चार्ज पद तात्काळ न काढल्यास व गालफडेची बदली न केल्यास निवेदन दिल्यापासून पंधरा दिवसानंतर उपोषणाचा मार्ग पत्करण्यात येईल आणि काही अनुचित प्रकार घडला तर यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. तसेच तलवाडा आरोग्य केंद्रातील कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांनी याच ठिकाणी कॉटरला (निवासस्थान) येथे राहण्यात यावे डॉक्टर, सुपरवायझर व रुग्णांना सेवा द्यावी. असे निवेदन पालकमंत्री धनंजय मुंडे जिल्हाधिकारी बीड, जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना सामाजिक कार्यकर्ते खिजर सौदागर ,रमेश नाटकर ,जयदेव शिंगणे, विकी मरकड आदींनी दिलेली असून सबंधांची तात्काळ बदली व चार्जर काढून घेण्यात यावे नसतात लोकशाही मार्गाने उपोषण करण्याचा इशारा देण्यात आलेला आहे.

तुम्ही जिंकलात म्हणजे आम्ही हरलो असं होत नाही

मुंबई । वृत्तसंस्था

राज्याच्या राजकारणासाठी आजचा दिवस खूप महत्वाचा होता. विधानसभा अध्यक्ष यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाच्या निकालाचे वाचन केले. यावेळी एकनाथ शिंदे यांची शिवसेना हीच खरी शिवसेना असल्याचा निकाल नार्वेकरांनी दिला आहे. तसेत गोगावले हेच मुख्य प्रतोद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आजच्या निकालानंतर शिवसेना(उबाठा) गटाच्या नेत्या सुष्मा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मागील अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या आमदार अपात्रता प्रकरणाचा आज अखेर निकाल लागला. अवघ्या राज्याचे लक्ष या निकालाकडे होते. आजच्या निकालात उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे, तर एकनाथ शिंदेंसह सर्व बंडखोर आमदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता या निकालांनंतर शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गटातील संघर्ष पुन्हा एकदा तीव्र होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आजच्या निकालानंतर शिवसेना नेत्या सुष्मा अंधारे

यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर प्रतिक्रिया दिली. सुषमा अंधारे म्हणाल्या की, तुम्ही जिंकलात म्हणजे आम्ही हरलो असं होत नाही, डाव तुमच्या हातात दिला तरी जिंकता तुम्हाला येत नाही , असा टोला त्यांनी आपल्या पोस्टमधून लगावला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी भाजप, नार्वेकर, एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांना टॅग केले आहे. सत्ताधाऱ्यांनी निकालाबाबत आधीच भाष्य केले होते, त्यानुसारच हा निर्णय आला आहे. अध्यक्षांनी विधिमंडळ पक्षाला महत्त्व दिल्याचे दिसून आले. त्यामुळे, आता पुन्हा एकदा ठाकरेंना सर्वोच्च न्यायालयात जावे लागेल. व्हीप बजावण्यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांनी विधिमंडळ पक्षाला महत्त्व दिले. तर, व्हीप देण्याबाबात पक्ष संघटना महत्त्वाची, असे कोर्टाने म्हटले होते. त्यामुळे, येथे सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वे डावलण्यात आली आहेत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी दिली. आजच्या निकालानंतर उद्धव ठाकरे सुप्रीम कोर्टात जाणार असल्याचे म्हटले आहे. शिवसेना शिंदेंची होऊच शकत नाही. शिवसेना कोणाची हे ठरवेणारे नार्वेकर कोण? नार्वेकरांकडून सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झालाय. नार्वेकर कोर्टालाही जुमानत नाहीत, हे या निकालावरुन सिद्ध झाले. त्यामुळे, त्यांच्याविरुद्ध अवमानयाचिका दाखल करता येते का, ते आम्ही पाहणार आहोत. आम्ही पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

फुटीर आमदारांची मर्जी संभाळण्यातच सरकारची दमछाक, राज्यातील प्रश्नांकडे दुर्लक्ष -काँग्रेस

सातारा । वृत्तसंस्था

राज्य सरकारला सत्ता टिकवण्यात रस असल्याचे स्पष्ट झाले आहे. पक्षातून फुटून आलेल्या आमदारांना सांभाळण्यातच राज्य सरकारमधील मंत्र्यांचा सर्वाधिक वेळ जात आहे. त्यामुळे जनतेच्या प्रश्नांना बेदखल केले जात आहे, अशी टीका काँग्रेसचे नेते व आमदार डॉ. विश्वजीत कदम यांनी सांगलीत पत्रकारांशी बोलतांना केली. जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीवर प्रशासन गंभीर नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दुष्काळी परिस्थितीतील उपयोजनांसाठी सरकारने सांगली जिल्ह्यासाठी ५०० कोटी रुपये वाढवून द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. डॉ. विश्वजित कदम म्हणाले, अवकाळी पाऊस आणि दुष्काळाचे संकट भेडसावत असताना राज्य सरकार मात्र सत्ता टिकविण्यात गुंतले आहे. सरकारला शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यापेक्षा सत्ता टिकवण्यामध्ये रस आहे. फुटून गेलेल्या आमदारांना सांभाळण्यांमध्ये सरकारची मर्जी असल्याचे दिसते.

सांगली जिल्ह्याला अवकाळी पावसासह दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. जानेवारी महिन्यात बहुतांश तालुक्यांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, अशी परिस्थिती असेल तर मार्च आणि एप्रिलमध्ये यापेक्षा भीषण परिस्थिती निर्माण होण्याची स्थिती दिसते. जिल्हा प्रशासन आणि सरकारने याबाबत गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे नियोजन समितीतून वाढीव निधी देण्याची गरज आहे. जिल्ह्यासाठी किमान ५०० कोटी रुपये वाढवून द्यावेत, अशी मागणी सरकारकडे पालकमंत्र्यांनी करणे गरजेचे आहे. -अवकाळी पाऊस आणि त्यानंतर पडलेल्या रोगामुळे द्राक्षबागांचे मोठे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने निधी देण्याची गरज आहे. -दुष्काळी परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. जिल्हा प्रशासन आणि पालकमंत्र्यांनी मार्ग काढण्याची गरज आहे. कोयनेतून पाणी सोडण्यासाठी वारंवार विनंती करावी लागत असल्याची बाब दुर्दैवी आहे, त्याचे नियोजन करावे. -महावितरण कंपनीचा गलथान कारभार प्रश्न उपस्थित करून डॉ. कदम यांनी पालकमंत्री खाडे यांच्याकडे अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. जिल्हा नियोजन समितीचा चालू आर्थिक वर्ष संपत आले तरीही कामांना मंजुरी नाही, ही जिल्ह्याच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचा मुद्दा डॉ. विश्वजित कदम यांनी उपस्थित केला. पालकमंत्र्यांनी याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. बहुतांशी कामांची वर्क ऑर्डर आणि प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. परंतु प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान ४ वरून...

दीनदयाळ उपाध्याय

पदाची एकुण पदे- २० शैक्षणिक पात्रता- बी.एस.सी बी.एड/एम.एस.सी.बी.एड/बी.ए.बी.एड/एम.ए.बी.एड वयोमर्यादा २१ ते ३० जॉब लोकेशन-बीड. रोजगार मेळाव्यात सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी पुढीलप्रमाणे सहभागी व्हावे नोकरी इच्छुक उमेदवारांनी नोकरी साधक गेलीशशज्ञशी म्हणून नोंदणी करुन आपल्या युजरनेम व पासवर्डचा वापर करुन डेसळप बटनावर क्लिक करावे. प्रोफाईल मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळावा-०६ या लिंक वर क्लिक करुन रोजगार मेळाव्याचा बीड जिल्हा निवडून ऋळश्रींशी बटनावर क्लिक करावे. त्यातील रलींळेप या पर्यायाखालील दोन बटना पैकी पहिल्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्याची माहिती दिसेल तर दुसऱ्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्यात रिक्त पदे दिसतील. दुसऱ्या बटनावर क्लिक केल्यानंतर एक संदेश येईल. सदर संदेश काळजीपुर्वक वाचा व ख रसीशश बटनावर क्लिक करावे.आपल्याला शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आवश्यक कौशल्य व अनुभव या नुसार पदाची निवड करावी लागेल व रश्रिू बटनावर क्लिक करावे आपल्याला एक संदेश दिसेल सदर संदेश काळजीपुर्वक वाचा व ओके बटनावर क्लिक करावे. आपला रोजगार मेळाव्यामध्ये ऑनलाईन सहभाग नोंदवला जाईल.याबाबत बीड जिल्हयातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी ुीक्षसरी.रहरीुरूरा.र्सी.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करावे या बाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाचा दुरध्वनी कं.०२४४२-२९९११६ , श्री.इंगोले ९८२२७८१८७६ , श्री. यादव यांना ८२०८३६९८९० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच इशशव ड्ढळश्रश्र या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन श्री. सुशिल उचले, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, यांनी केले आहे.

अंबाजोगाईकरांनी

१० हजार, तृतीय सोमनाथ माने रोख रक्कम ६ हजार,
७४ किलो गट -: सचिन शिर्के प्रथम १० हजार, द्वितीय रमेश चव्हाण ७ हजार, तृतीय अमर कदम ५ हजार
६६ किलो गट -: तुशार खामकर प्रथम ८ हजार, द्वितीय अमन शेख ६ हजार, तृतीय समाधान भोसले ४ हजार रूपये
६१ किलो गट -: प्रथम दयानंद सलगर ७ हजार, द्वितीय आशिष नेहराळे ५ हजार, तृतीय बाळु जमादार ३ हजार रूपये
५७ किलो गट -: प्रथम श्रीकांत शेंगर ६ हजार, द्वितीय नारायण गिरी ४ हजार, तृतीय शुभम कारले २ हजार रुपये
५० किलो गट -: प्रथम लहु चौरे ४ हजार, द्वितीय अजय बहिरवाल २ हजार, तृतीय शुशांत कांबळे १ हजार रुपये
अशी बक्षीसे देण्यात आली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

महाज्योती फेलोशिपचा पेपर फुटला; परीक्षेवर बहिष्कार

नागपूर । वृत्तसेवा

सारथी, महाज्योती या संस्थांच्या माध्यमातून पीएच.डी. फेलोशिपसाठी घेण्यात आलेल्या महाज्योती पीएचडी परीक्षेचा पेपर फुटल्याची धक्कादायक बाब नागपुरात उघडकीस आली आहे. नागपुरातील कमला नेहरू महाविद्यालयातील सेंटरवर हा प्रकार घडला आहे. या पेपरफुटीवर आक्षेप घेत विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकला आहे. महाज्योती पीएचडी फेलोशिपच्या पेपरमधील ४ पैकी २ सेटला सील नसल्याने हा पेपर लीक आसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. सलग तिसऱ्यांदा या परीक्षेत गोंधळ झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये शासनाविरुद्ध प्रचंड रोष आहे. शासनाने सर्व विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप द्यावी, अशी मागणी आता विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. सारथी, महाज्योती या संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या पीएच.डी. फेलोशिपसाठी आज, बुधवारी राज्यातील ४ प्रमुख केंद्रांवर पात्रता परीक्षा घेण्यात आली. दरम्यान, नागपुरातील कमला नेहरू महाविद्यालयात ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र, या परीक्षा केंद्रांवर महाज्योती पीएचडी फेलोशिप परीक्षेचा पेपर पुन्हा फुटल्याने एकच खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या चार सेट पैकी २ सेट हे लीक असून ते झेरॉक्स कॉपी असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. – आणि इ सेट हे सीलबंद असून उर्वरित उ आणि ऊहे लीक आहेत. शिवाय त्यांना स्टेपलर केलेल्या पिन आढळून आल्या आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांना पेपर झेरॉक्स कॉपी देण्यात आले असून हे पेपेर फुटलेले आहेत, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. परिणामी, या पेपरफुटीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकला आहे. सर्व विद्यार्थी कमला नेहरू महाविद्यालयाच्या पटांगणामध्ये उभे राहून आंदोलन करत आहेत.

नोटिफिकेशनमध्ये अशा स्पष्ट सूचना आहेत की, परीक्षा केंद्रांवर देण्यात येणारा पेपर हा विद्यार्थ्यांसमक्ष तपासून पळताळणी करून घ्यावी. समाजा तो पेपर सेट लिक अथवा आधीच खुला असेल, तर तो स्वीकारू नये, असे स्पष्टपणे नोटिफिकेशनमध्ये म्हटले आहे. मात्र विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या पेपरमधील – आणि इ सेट हे सीलबंद असून उर्वरित उ आणि ऊहे लीक आहेत, त्यावरून शंका उपस्थित झाली. या पूर्वीदेखील सेट विभागाचा गलथान कारभार अनेकदा चव्हाट्यावर आला आहे, त्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांसोबत खेळ खेळला जात आहे का? असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यांतून विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी येत असतात. शासन जर वारंवार अशा चुका करत असेल, तर यावरून ते किती गंभीर आहेत हे लक्ष्यात येतं. आम्ही या परीक्षेवर बहिष्कार टाकला आहे आणि शासनाने आम्हा सर्व विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप द्यावी, अशी आग्रही मागणी आता विद्यार्थ्यांच्या वतीने जोर धरु लागली आहे.

राज्यभरात अपघाताच्या क्लेमचा गेम; मृताच्या नातेवाइकांना मिळणाऱ्या विमा रक्कमेवर डल्ला

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

छत्रपती संभाजीनगरसह राज्यभर अपघाताच्या 'क्लेमचा गेम' सुरू आहे. अपघातात मयत पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाइकांना क्लेमची ७० ते ८० टक्केच रक्कम दिली जाते. उर्वरित क्लेमच्या रकमेवर अनेकजण डल्ला मारतात. राज्यातील अपघाताच्या केस थेट कर्नाटकातही देण्याचाही प्रकार सुरू असल्याचे सांगण्यात आले. 'अपघाताची केस आम्हालाच द्या, चांगला क्लेम मिळवून देऊ. तुम्हाला काहीही खर्च येणार नाही. फक्त क्लेममध्ये १० ते १५ टक्के आमचे...' असे 'दुकान' मांडण्याचा उद्योग घाटीतील शवविच्छेदनगृह परिसरात सुरू आहे. यासंदर्भात 'लोकमत'ने ९ जानेवारी रोजी सविस्तर वृत्त प्रकाशित केले. या वृत्तानंतर राज्यातील अनेक ठिकाणी असाच प्रकार सुरू असल्याचे सांगत अनेकांनी 'लोकमत'कडे कैफियत मांडली. रुग्णालयासह तपास करणाऱ्या यंत्रणेतील अनेकांचा 'क्लेम'च्या उद्योगात सहभाग असून, मृताच्या नातेवाइकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे सांगण्यात आले. क्लेमची प्रकरणे काही मोजक्या लोकांकडेच सर्वाधिक का आहेत, याचा शोध यंत्रणेने घेण्याची गरज आहे, असे सांगण्यात आले. क्लेमची रक्कम जास्तीत जास्त मिळण्यासाठी कागदोपत्री गैरप्रकारही केले जात असल्याचे सांगण्यात आले. अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या नातेवाइकांना काही एजंट शवविच्छेदनगृहाच्या परिसरातच एक ते दीड लाख रुपयांची रक्कम मदत म्हणून देतात. त्यातून अपघाताची केस त्या एजंटला मिळण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचे सांगण्यात आले. अपघात होताच माहिती पुरविणारे कामाला लागतात. राज्यभर हा प्रकार सुरू आहे. बार्शी तालुक्यात एक अपघात प्रकरण कर्नाटक राज्यामध्ये विजयपूर कोर्टातील वकिलांकडे देऊ, तेथे पैसे जास्त मिळतात, अशा भूलथापा देण्यात आल्या. शेवटी ते प्रकरण विजयपूर कोर्टात देण्यास भाग पाडलेच. असा प्रकार सर्रास सुरूच आहे.

निकाल देण्यात किती वेळकाढूपणा झाला –दानवे

मुंबई । वृत्तसंस्था

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आम्ही निकाल ऐकायला आलेलो आहोत. निकाल ऐकत असताना निकाल किती तारखेला लागला, चालढकल किती झाला, वेळकाढूपणा किती झाला हे महाराष्ट्राला काय देशाला माहिती आहे. न्यायाधीशाच्या भूमिकेत जे आहेत, जे आरोपी आहेत जे १६ लोकं आहेत. मुख्यमंत्र्यांची भेट न्यायाधीशाच्या भूमिकेत असणाऱ्या अध्यक्षांनी घेतलेली आहे, असं अबादास दानवे म्हणाले. ज्या पद्दतीनं वेळकाढूपणा, ज्यांच्यावर आरोप आहे त्यांना प्रोटोकॉल सोडून भेटलं जातं, यामुळं मनात शंका निर्माण होते. मात्र, आमचा न्याय व्यवस्थेवर विश्वास आहे, असं विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे म्हणाले. आम्ही फक्त १६ आमदारांबद्दल बोलत आहोत. ज्या १६ आमदारांनी गद्दारी केलेली आहे, त्यांच्यावर कारवाई व्हावी, आमची भूमिका आहे. सुप्रीम कोर्टानं गद्दारांनी नेमलेला व्हीप रद्द केलेला आहे. शिवसेना आमदारांनी दिलेल्या अधिकारानुसार उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना गटनेता केलं होतं. त्यानंतर अजय चौधरी यांना गटनेता केलं होतं.

सुसंस्कारीत बालक उद्याचे आदर्श नागरीक बनतील

बीड । प्रतिनिधी

सुंस्कारीत बालक उद्याचे आदर्श नागरीक बनतील, पालकांनी व बालकांनी क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले सावित्रीमाई फुले, शेख फातेमा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाकरीता केलेल्या अनमोल कष्टाची व माता रमाईच्या त्यागाची आठवण ठेवून शिक्षण घ्यावे असे प्रतिपादन प्रशांत वासनीक यांनी केले. आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुलेंच्या समकालीन फातेमा शेख यांनी परंपराची पोलादी चौकट मोडून शिक्षण घेतले व सावित्रीमाईंनी सुरु केलेल्या आध्यापक विद्यालयात पहिली प्रशिक्षित शिक्षिका म्हणून काम केले. त्यांच्या अनमोल कार्यास महामानव अभिवादन ग्रुपने सुरु केलेल्या मोफत शिकवणी वर्ग भिमनगर मोंढा रोड येथे अभिवादन कार्यक्रमास आण्णासाहेब शेळके लाभले होते तर प्रशांत वासनीक, अविनायक पायके प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. से.नी.ई.डी.आय. ए.एल. औसरमल व महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले व कॅप्टन राजाभाऊ आठवले यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम तथागत गौतम बुध्द यांच्या प्रतिमेस पुष्प तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीकारी शिक्षिका फातेमा शेख यांच्या प्रतिमेस उपा.संघमित्रा वाघमारे व मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्जुन बी.जौंजाळ यांनी केले तर सुत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. ६ वीच्या वर्गातील नंदिनी धन्वे या विद्यार्थीनीने फातेमा शेख यांच्या जीवनावर उत्स्फुर्तपणे भाषण केले. तिचा मान्यवरांच्या हस्ते उत्तेजनार्थ मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य (वही–पेन) व रोख रक्कम देवून वाचाल तर वाचालतर्फे सत्कार करण्यात आला. शिकवणी वर्गातील गुणवंत ८ विद्यार्थ्यांचा शालेय साहित्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अविनाश पायके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात आण्णासाहेब शेळके म्हणाले की, शिक्षणाशिवाय पर्याय नाही. उच्च शिक्षण घेवून स्वत:च्या उध्दाराबरोबरच सामाजिक ऋणाची जाणीव ठेवून 'पे बॅक टु सोसायटी' या अनमोल वचनाचे आठवण ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ठेवणे गरजेचे आहे असे पालक व विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बी.डी.तांगडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास रविंद्र टेकाळे सर, डी.जी.वानखेडे व परिसरातील बहुसंख्य पालक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे खाऊ वाटप करुन सरणात्तयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

निधी खर्चात राज्यात नाशिक चौथ्या क्रमांकावर

नाशिक । वृत्तसंस्था

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पुढील आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी १००२.१२ कोटींचा प्रारूप आराखडा करण्यात आला आहे. तसेच २०२३–२४ यावर्षात विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी व्यपगत होणार नाही, याची काळजी घेण्यात येवून सर्व यंत्रणांनी निधी वेळेत खर्च करण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री भुसा यांनी दिल्या आहेत.

असे असणार २०२४–२५ साठी जिल्ह्याचे नियोजन

जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत रुपये ६०९.०० कोटी, आदिवासी उपयोजनेतंर्गत रुपये २९३.०० कोटी आणि अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रुपये १००.०० कोटी अशी तिनही योजनांसाठी एकूण रुपये १००२.१२ कोटी इतकी आर्थिक मर्यादा असल्याचे शासनाने सांगितले आहे. २०२४–२५ चा आराखडा तयार करतांना गाभाक्षेत्र, बिगर गाभा क्षेत्र व इतर क्षेत्र बाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार नियतव्यय प्रस्तावित करण्याची काळजी घेतली आहे. त्याचप्रमाणे २०२४–२५ या वर्षासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत रूपये २५० कोटींची वाढीव मागणी, आदिवासी उपयोजनेतंर्गत रूपये २८९ कोटींची वाढीव मागणी आणि अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रुपये ७५ कोटींची वाढीव मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजना २०२३–२४ अंतर्गत डिसेंबर २०२३ अखेर सर्वसाधारण योजनेत ६८० कोटींचा नियतव्यय मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ४७१.११ कोटी प्राप्त निधीच्या अनुषंगाने ३११.१७ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. त्यापैकी २३९.८१ कोटी निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच आदिवासी उपयोजना अंतर्गत १७४.८६ या प्राप्त निधीच्या अनुषंगाने ११८.७६ कोटी निधी वितरित करण्यात आला असून ११८.७६ कोटी निधी १०० टक्के खर्च करण्यात आला आहे.

राज्यात खासगी २४ संस्थांची होऊ शकतात समूह विद्यापीठे, उच्चशिक्षण विभागाचे प्रयत्न

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० नुसार राज्यात समूह विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय उच्चशिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार राज्यात २४ खासगी व्यवस्थापनांतर्गत असलेल्या महाविद्यालयांची समूह विद्यापीठे स्थापन करण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर शहरात चार समूह विद्यापीठे स्थापन होतील, अशी माहिती आहे. त्यावर उच्चशिक्षण विभाग काम करीत असून, लवकरच शासकीय महाविद्यालयांचे समूह विद्यापीठ स्थापन करून कार्यान्वित केले जाणार आहे. त्यास उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दुजोरा दिला आहे.

...तर चार समूह विद्यापीठे स्थापन होऊ शकतात

छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, मौलाना आझाद शिक्षण संस्था आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटी संस्थांसह शासकीय महाविद्यालयांची मिळून चार समूह विद्यापीठे स्थापन करण्याचा शासनाचा विचार आहे. मशिप्र मंडळाची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनुदानित तीन, तर विनाअनुदानित ५ पेक्षा अधिक महाविद्यालये आहेत. मौलाना आझाद शिक्षण संस्थेच्या चार अनुदानित महाविद्यालयांसह एकूण ९ कॉलेजेस आहेत.

विद्यापीठांची संख्या

१३ अकृषी, २५ खासगी, २५ अभिमत, १ शासकीय समूह विद्यापीठ, २ खासगी समूह विद्यापीठे

सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ हे पहिले युनिटरी शासकीय विद्यापीठ ठरले आहे.

समूह विद्यापीठांच्या स्थापनेमुळे पारंपरिक विद्यापीठांवर येणारा ताण कमी होईल. समूह विद्यापीठे परिसरातील गरजेनुसार अभ्यासक्रमांची रचना, मांडणी करतील. परीक्षांमध्ये होणारे गोंधळ थांबतील. परीक्षांचे निकालही वेळेवर लागतील.

२०३ कोटींच्या कर्जप्रकरणी वैद्यनाथ कारखाना विक्रीस

बीड । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना परळीच्या वैद्यनाथ कारखाना प्रकरणात आणखी एकदा धक्का बसला. २०३ कोटींच्या थकीत कर्जप्रकरणी युनियन बँकेने या कारखान्याचा ई–लिलावाची प्रक्रिया २५ जानेवारी रोजी ठेवली आहे. यासंदर्भात पंकजा यांनी मौन बाळगले आहे. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी १९ कोटींच्या थकित करापोटी जीएसटी विभागानेही या कारखान्यावर कारवाई केली होती. पंकजा मुंडे अध्यक्ष असलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना काही वर्षांपासून आर्थिक अडचणीत आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी काही कारखान्यांना अर्थसाह्य केले होते, मात्र त्यात प्रस्ताव देऊनही पंकजांना नाकारले होते. त्यामागे भाजपचे अंतर्गत राजकारण असल्याची चर्चा होती. आता यात 'पॅचअप'च्या भूमिकेत असलेल्या पंकजांवर पुन्हा नवे संकट उद्भवले आहे. कारखान्याच्या कौठाळी व पांगरी येथील ६७ हेक्टर शेतजमिनीसह याच दोन गावांतील २४ हेक्टर बिगरशेती जमिनीचाही लिलाव होणार आहे. यासह शुगर प्लँटची कारखाना इमारत, जुना डिस्टिलरी प्रकल्प, नवा डिस्टिलरी प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, निवासी क्वार्टर्स, जनरेशन प्लँट व प्लँट मशिनरींचा लिलाव होणार असल्याचा नोटीसमध्ये उल्लेख आहे. मशिनरी व प्लँटची राखीव किंमत ६२ कोटी २५ लाख रुपये आहे, तर जमीन व इमारतीची राखीव किंमत ४५ कोटी ८६ लाख रुपये असल्याचे नोटिसीत म्हटले आहे.

अनिल जगताप यांचा कार्यकर्त्यांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या इतिहासात पाचशेपेक्षा अधिक गाड्यांचा ताफा घेऊन शिवसेनेत प्रवेश करणारा अनिल जगताप हा पहिला शिवसैनिक आहे. आजपर्यंत बाळासाहेब तथा शिवसेनेप्रति असणारी अनिलची निष्ठा आणि प्रामाणिकता पायदळी तुडवण्याचे काम करण्यात आले. परंतु अवघ्या महाराष्ट्रास स्वतःचं कुटुंब मानणारा हा कष्टकरी, शेतकरी, सामान्यांचा मुख्यमंत्री, बाळासाहेबांचा खरा शिवसैनिक एकनाथ शिंदे कधीच अनिल जगताप यांच्या विश्वासाला तडा जाऊन देणार नाही. आजवर बीडकडे अनेकांनी दुर्लक्ष केले पण इथून पुढे बीडवर माझे विशेष लक्ष राहील असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. काल दि. ९ जानेवारी २०२४ रोजी उशिरा रात्री मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवास्थानी उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख अनिलदादा जगताप यांनी सरपंच, नगरसेवक, पदाधिकारी तथा आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला. याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

होती. यादरम्यान एकनाथ शिंदे यांनी बीडमधून आलेल्या सर्व शिवसैनिकांचा हृदय सत्कार करून स्वागत केले आणि त्यांच्याशी मुक्त संवाद साधला. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या चाळीस वर्षांपासून बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना अनिलदादा जगताप यांनी बीडमध्ये जिवंत ठेवली. पण उद्धव ठाकरे यांनी बीड जिल्ह्याकडे आणि वैयक्तिक त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पण आता असे होणार नाही. अनिलची निष्ठा आणि प्रमाणिकता मला माहित आहे त्यामुळे इथून पुढे बीडकडे माझे विशेष लक्ष राहील. महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण अनेक निर्णय घेतले, अनेक प्रश्न सोडवले, महिला सक्षीमीकरण असेल तसेच गोरगरीब शेतकऱ्यांसाठी देखील आपण पुढाकार घेऊन त्यांच्या अडचणी सोडवल्या. सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवण्याचा प्रयत्न आपण सरकारच्या माध्यमातून करत आहोत. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, विद्यार्थी विद्यार्थिनी यांना दिलासा देणारे अनेक निर्णय आपण आजवर घेतले असून ते लोकांपर्यंत पोहचवून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करण्यासाठी एकदिलाने कामाला लागा असे आवाहन यावेळी केले. बाळासाहेबांनी, दिघे साहेबांनी आपल्याला देत राहण्याचे संस्कार बिंबवलेले आहेत त्यामुळे आपण त्यापद्धतीने कार्य करत आहोत. लक्षात घ्या, अनेकांना वाटलं हे टिकणार नाहीत, याचं सरकार पडणार पण बाळासाहेब, दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने शिवसेनेत दररोज प्रवेश होत आहेत. याचबरोबर मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टिकेची झोड लावली. बीडमध्ये शिवसेनेचा मेळावा होणार आहे निश्चितच यावेळी उपस्थित राहील. बीडवासियांसाठी मी अनेक सेवा देण्याचे काम करणार आहे. अनिलसह तुम्ही सर्व कार्यकर्त्यांनी जो माझ्यावर विश्वास दाखवला तो मी सार्थ करून दाखवेल. तुमच्यासारखी निष्ठावंत कार्यकर्ते हेच माझे शक्ती आहे. आजपर्यंत जो अन्याय झाला, त्रास झाला तो विसरा माझ्याकडे तुम्हाला सर्वांना न्याय मिळेल. यादरम्यान अनिलदादा जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, वाईट काळात मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी बीडमध्ये शिवसेनेची ताकद राखून ठेवली. शिंदे साहेब तुम्ही आशीर्वाद, सहकार्य ठेवा आपल्या नेतृत्व मार्गदर्शनाखाली अवघे बीड शिवसेनामय करून टाकू असा शब्द मी तुम्हाला देतो. अनिलदादा यांनी बाळासाहेब तथा दिघे साहेब यांच्या नामाचा जयघोष करून शिवसेनेत प्रवेश केला. यादरम्यान संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांनी अनिलदादा जगताप व त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे सत्कार करून स्वागत केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बीड जिल्हयासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न; जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

बीड । प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ चा आढावा उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी ऑनलाईन पध्दतीने घेतला. यावेळी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मुंडे, सर्वश्री सोळंके, आजबे हे मुंबईहून तर उपआयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून ऑनलाईन पध्दतीने बैठकीला उपस्थित होते. बीड येथून जिल्हाधिकारी मुधोळ, पोलीस अधीक्षक ठाकूर,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी साळुंखे, जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांच्यासह सर्व विभागप्रमुख बैठकीस उपस्थित होते. दुपारी ३.०० ते ३:३० या वेळेत झालेल्या या ऑनलाईन बैठकीत जिल्हयाच्या विकास आराखडयाचे सादरीकरण जिल्हाधिकारी मुधोळ - मुंडे यांनी केले. पालकमंत्री, बीड यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत रू. ४१०.०० कोटी मंजूर असून रू. २८७.०० कोटी निधी जिल्ह्यास प्राप्त झाला आहे असे सांगितले. त्यापैकी रू. २१९.३५ कोटी रकमेच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत असल्याची माहिती त्यांनी वित्त मंत्री यांना दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी रू. १४५.५२ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून रू. ३९.३९ कोटी खर्च झाला असल्याचे सांगितले. तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ साठी ४०० कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा सादर केला. तसेच जिल्ह्याच्या विविध योजनांसाठी रू. १४०.०० कोटींचा अतिरिक्त निधी आवश्यक असल्याचे सांगितले. नावीन्यपूर्ण उपक्रमातून जिल्हयासाठी जास्तीत जास्त् निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे वित्तमंत्री श्री. पवार यांनी आश्वासन दिले. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा विकास आराखड्याबाबत उपमुख्यमंत्री यांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत नारायणगड व गहिनीनाथगड या जिल्ह्यातील मंजूर कामांवरील निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांनी सन २०२२-२३ अंतर्गत देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता संपूर्णपणे आयपास या संगणकीय प्रणालीमध्ये अद्ययावत करण्याबाबत निर्देश दिले. जिल्ह्यातील वडवणी तालुक्याचा आकांक्षित तालुक्यामध्ये सामावेश करण्यात आला असल्याने त्यास विशेष निधी मंजूर करण्यात येईल व मागील वर्षाच्या तुलनेत अधिकचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी या बैठकीत दिले.

मराठा समाजाचा सर्व्हे मागास आयोगाकडून लवकर व्हावा

मराठा आरक्षण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्य मागास आयोगाकडून मराठा समाजाचा केला जाणारा सर्व्हे २० जानेवारी २०२४ च्या आत करावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडने मुख्यमंत्र्यांना तहसीलदार यांच्या माध्यमातून बुधवार, दिनांक १० जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सदरील निवेदनात संभाजी ब्रिगेडने नमूद केले आहे कि, २० जानेवारीला कोटींच्या संखेने मराठा समाज हा मुंबईला जाणार आहे. महाराष्ट्रातील काही भागातून जेवढे मराठा आहेत. ते संपूर्ण मुंबईला जाणार आहेत. महाराष्ट्रातील मराठा समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती जाणून घेण्यसाठी येत्या काही दिवसांत दिवसाच्या कालावधीमध्ये जो सर्व्हे केला जाणार आहे. तो दि २० जानेवारी किंवा त्यापुढे गेला तर १०० टक्के सर्व्हे होणार नाही. कारण, काही गावामध्ये एकही मराठा बांधव न थांबता अख्खे गाव मुंबईकडे रवाना होणार आहे. केला जाणारा सर्व्हे हा १०० टक्के व्हावा त्यासाठी प्रत्येक मराठा कुटुंब आणि मराठा व्यक्ती कोणीही यातून सुटू नये यासाठी दि. २० जानेवार २०२४ च्या आत सर्व्हे पूर्ण करण्यात यावा. अशी मागणी संभाजी ब्रिगेड, अंबाजोगाईच्या वतीने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. सदरील निवेदन संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या आदेशानुसार देण्यात आले.

सूक्ष्म सिंचन योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी शासन सकारात्मक

परळी । प्रतिनिधी

प्रति थेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन योजनेतील सूक्ष्म सिंचन उत्पादक, वितरक आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन कृषिमंत्री मुंडे यांनी केले 'पर ड्रॉप मोअर क्रॉप'अर्थात प्रति थेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन या योजनेतील अडचणींबाबत इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडियाच्या शिष्टमंडळाने आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष झुंबरलाल भंडारी, उपाध्यक्ष के एम महामूलकर, सचिव संदीप जवळेकर, कमलेश दास, तसेच शासनाच्या कृषी विभागाचे अधिकारी वर्ग उपस्थित होते. सूक्ष्म सिंचन योजनेचा केंद्र सरकारकडून देण्यात येणारा निधी लवकरात लवकर प्राप्त करून घेऊन त्याचे वितरण करण्यात येईल, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मधील शेतकऱ्यांच्या पूरक अनुदानात योजनातील नियमावलीत बदल करून उत्पन्नाची अट शिथिल करण्याबरोबरच बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत पूरक अनुदानाची कमाल मर्यादा वाढवणे यासाठी शासन सकारात्मक आहे. महाडीबीटी पोर्टल वरील अडचणींची सोडवणूक करण्यात येईल,असे यावेळी कृषिमंत्री मुंडे यांनी आश्वासित केले. तसेच इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडियाला राज्यस्तरीय समितीमध्ये प्रतिनिधित्व देण्याबाबत वेगळा प्रस्ताव सादर करा असे आदेश यावेळी कृषी मंत्री मुंडे यांनी दिले.

रनहिट कायदा रद्द करण्यासाठी नेकनूरमध्ये रास्ता रोको

बीड । प्रतिनिधी

रनहिट कायदा रद्द करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी नेकनूर येथे मोटार मालक-चालक संघटनेच्या वतीने बसस्थानका समोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती तर बीड येथील चालक-मालक संघटनेनेही जिल्हा पोलीस अधिक्षक यांची भेट घेून आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी केंठद्र सरकारने मोटारवाहतूक संदर्भातला कायदा केलेला आहे. हा कायदा जाचक असून सदरील कायदा रद्द करण्यात यावा, अशी मागणी चालक-मालक संघटनेच्या वतीने होत आहे. आज नेकनूर येथील चालक-मालक संघटनेने बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन केले. हे आंदोलन फेरोज पठाण यांच्या नेतृत्वाखाली झाले. या वेळी राजाभैय्या, नदीम मंडोला, सय्यद रिजवान यांच्यासह आदींची उपस्थिती होती तर बीड येथेही चालक-मालक संघटनेने जिल्हा पोलीस अधिक्षक यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे.

बिबट्याचा गाव शिवारात धुमाकूळ सुरूच

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावच्या गावखेड्यात तब्बल आठवड्यापासून बिबट्याचा सुरू असलेला धुमाकूळ थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे.परवाच रामपिंपळगावच्या घटनेत वीस शेळ्या फाडल्यानंतर बिबट्याने पुन्हा एकदरा व सुलतानपूर येथे दि ०९ जानेवारी मंगळवार रोजी रात्री तीन मेंढ्यांसह एका गाईची शिकार केली आहे. दरम्यान बिबट्याच्या मुक्त संचाराने परिसरातील पशुधनावर मृत्यूची टांगती तलवार लटकत आहे.तर बिबट्याला जेअरबंद करण्यात वनविभागाचे सर्वच प्रयत्न आतापर्यंत निष्कळ ठरत असल्याची स्थिती आहे. माजलगाव तालुक्यातील गावखेड्यातला माणूस बिबट्याच्या धुमाकळीने धास्तावला आहे. आठवड्यापासून बिबट्या जनावरांच्या शिकारी करीत बेफान सुटला आहे.त्यामुळे हे काम एका बिबट्याचे नसून नरमादी अशी जोडी असणाऱ्या दोन बिबट्यांचे आहे.अशी चर्चा आहे.तर परिसरात वाघही फिरत असल्याच्या अफवांचे पेव फुटले आहे.दरम्यान वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून वाघ असल्याची अफवा असल्याचे सांगण्यात येत आहे.तर बिबट्याच्या नरमादीची जोडी असू शकते, असेही वनविभागाने मान्य केले आहे

सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या स्थानिक नियोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या व प्राथमिक माध्यमिक संकुलाच्या स्थानिक नियोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा आज भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालय माजलगाव याठिकाणी भारतीय जनता पार्टीचे विधानसभा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांच्या हस्ते पार पडला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील हे होते तर या कार्यक्रमासाठी सिद्धेश्वर संकुलाचे नवीन नवनियुक्त पदाधिकारी सुरेंद्र रेदासनी, अँड.विश्वासराव जोशी,शशीकिरण गडम,अभय शेठ कोकड, संतोषराव अब्बड, प्रशांतराव भानप, लक्ष्मीकांत जोशी,एकनाथराव जाधव,पवन मानधने हे उपस्थित होते. यावेळी अँड.विश्वासराव जोशी यांनी बोलताना सांगितले सिद्धेश्वर विद्यालयातून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले त्यांनी संस्थेचा नावलौकिक वाढवला मोहनराव जगताप हे देखील सिद्धेश्वर विद्यालयाचे माजी विद्यार्थी असून ते देखील माजलगाव मतदार संघामध्ये चांगलं काम करत असून जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात ते संस्थेचे विद्यार्थी असल्याचा आम्हाला अभिमान आहे.यावेळी सुरेंद्र रेदासणी, अभयजी कोकड, डॉ.प्रशांतजी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचा सत्कार भारतीय जनता पार्टी माजलगाव विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप यांच्या हस्ते पार पडला.या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे,संचालक प्रा.दत्तात्रय वाळसकर,जेष्ठ नेते बबनराव सिरसट, नानासाहेब घोडके, जगदीशराव बादाडे,प्रल्हादराव होके, अशोकराव किर्जत, प्रकाशराव चव्हाण, मा.नगरसेवक ईश्वर होके,अविनाशराव गोंडे, सरपंच भालचंद्र सोळंके,प्रल्हाद दळवी, रमेशराव मोरे,यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता महाजन प्रस्ताविक मा.नगरसेवक विनायक रत्नपारखी आभार मा.नगरसेवक शरद यादव यांनी मानले.

बीड येथील ओबीसींच्या एल्गार मेळाव्याला उपस्थित रहावे - विलास नेमाने

माजलगांव । प्रतिनिधी

ओबीसी समाजाची एकजुट व्हावी, यासाठी बीड येथे दि.१३ रोजी ओबीसी एल्गार मेळावा होत असून या सभेला मोठ्या संख्येने ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे, असे अवाहन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा मल्हार सेनेचे तालुका प्रमुख विलास नेमाने यांनी केले आहे. ओबीसी समाज मागील काही वर्षात हा समाज विखुरल्याचे चित्र आहे. विखुरलेला समाज पुन्हा एकत्र यावा, यासाठी जेष्ठ मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वात बीड येथे एल्गार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसीमध्ये अंतर पडलेले होते, हा समाज एकत्रित यावा, आपल्या हक्कावर गदा येत असेल तर त्यासाठी एकजूट करावीच लागणार आहे, या हेतूने आता सर्वजण एकत्रित येत आहेत. दि.१३ रोजी होणाऱ्या एल्गार सभेला सर्व ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे, असेही ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा मल्हार सेनेचे तालुका प्रमुख विलास नेमाने यांनी म्हटले आहे.

अंबाजोगाईकरांनी अनुभवला कुस्त्यांचा थरार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या यात्रेनिमित्त मुकुंदराज स्वामी क्रिडा मंडळ व व्यायाम शाळा यांच्या वतीने दरवर्षी कुस्त्यांच्या स्पर्धेचे आयोजन केले जाते. याही वर्षी मुकुंदराज स्वामींच्या समाधी परिसरात हालक्यांच्या खन खणाटात कुस्त्यांचा फड रंगला. संपुर्ण महाराष्ट्र भरातून या स्पर्धेसाठी कुस्ती पटु सहभागी झाले होते. यावेळी शहर वासियांनी कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. अद्यकवी मुकुंदराज स्वामी क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा अंबाजोगाई यांच्या वतीने दरवर्षी मुकुंदराज स्वामींच्या यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा घेतली जाते. मात्र या वर्षी पहिल्यांदाच मुली ही कुस्तीच्या आखाड्यात उतरल्या व त्यांनी न लाजता न डगमगता मुलांसोबत कुस्ती खेळली व बक्षीसही मिळविले. यावर्षी पासुन सुरू झालेल्या. या मुलींच्या कुस्त्या पुढच्या वर्षी मोठे रूप धारण करणार असल्याचे संयोजन समितीचे अध्यक्ष लोंढाळ व सचिव प्रशांत आदनाक यांनी सांगितले.

कुस्तीतील बक्षीस विजेते

खुला गट - बाळु बहिरवाल (आष्टी पाटोदा) प्रथम, रोख रक्कम २५ हजार रूपये, द्वितीय-भरत कराड (रामेश्वर जि.लातूर) रोख रक्कम १५ हजार, तृतीय गोरे (लातूर) रोख रक्कम ११ हजार,

८४ किलो गट -: प्रथम भाऊ वणवे रोख रक्कम १५ हजार, द्वितीय काळे रोख रक्कम ▶▶ पान २ वर

दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा होणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास,रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रच्यावतीने पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन दिनांक १२ ते १४ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आलेले आहे. सदर मेळाव्यामध्ये नांमाकित कंपनीच्यावतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी, याकरिता ऑनलाईन मुलाखती घेण्यात येणार आहेत. भारतीय जीवन विमा निगम बीड येथे १.विमा प्रतिनिधी या पदाची एकुण पदे - ७२ शैक्षणिक पात्रता- बारावी उत्तीर्ण वयोमर्यादा- १८ ते ४५ जॉब लोकेशन - बीड गुरुकुल इंग्लिश स्कुल बीड येथे १. प्रायमरी टिचर या ▶▶ पान २ वर

गेवराई तालुक्यात वाळूची तस्करी जोरात, अवैध वाळु वाहतुकीवर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध वाळूची तस्करी केली जात असून गेल्या दोन दिवसांपुर्वी याठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी करीश्मा नायर यांनी गोदाकाठच्या गावांना भेटी दिल्या होत्या. यानंतर रात्री त्यांनी सावरगाव, सावळेश्वर व म्हाळसा पिंपळगाव या परिसरातून अवैध वाळू वाहतूक करण्यार्या पाच हायवा ताब्यात घेऊन २ कोटी रुपयांचा ऐवज जप्त धडाकेबाज कारवाई केली. गेल्या दोन दिवसांपुर्वी गोदाकाठच्या काही गावांत ग्रामसभेनिमित्त अप्पर जिल्हाधिकारी करीश्मा नायर यांनी भेटी दिल्या होत्या तसेच परिस्थिती लक्षात आल्यानंतर त्यांनी स्वत; पोलिस प्रशासनासह आज गोदापट्ट्यात छापा मारत ही धडाकेबाज कारवाई केली असून या कारवाईने वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान ज्या हायवा गाड्या पकडल्या आहेत त्याच्यांवर यापुर्वीच देखील कारवाई झालेली आसून त्यांना दंड केल्यानंतर शासनाने या गाड्यातून वाळू वाहतूक करता येणार नाही असे पत्र घेतल्यानंतर ही या गाड्या अवैध वाळू वाहतूक करत असल्याची गंभीर बाबही समोर आली आहे. सदरची कारवाई ही अप्पर जिल्हाधिकारी करीश्मा नायर, तहसिलदार संदिप खोमणे, गौणखनिज अधिकारी माधव काळे, मंडळ अधिकारी सुनिल तांबारे, मंडळ अधिकारी अंगद काशिद यांच्यासह आदींनी केली.